IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेतील आव्हाने व उपाय

प्रा. डॉ. सिध्दार्थ एस. मेश्राम
अर्थषास्त्र विभाग प्रमुख,
जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
भंडारा– 441904

**सारांष :**

भारतीय अर्थव्यवस्थेला 20 व्या शतकात अनेक बऱ्या वाईट घटनांचा सामना करावा लागला. तरीही अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत मजबुतीमुळे 1990 व्या दशकामधील वैश्विक आर्थिक घटनांचा पाहिजे तेवढा प्रभाव भारतीय अर्थव्यवस्थेवर पडला नाही. 1980–90 च्या कालावधीतील वैश्विक औद्योगिक मंदी, दक्षिण पूर्व आशियायी देशांवरील संकट, अमेरिकेचे आर्थिक प्रतिबंध, कारगील संकट, ओरिसामधील तुफानाचे संकट इत्यादी घटनांचा प्रभाव पडूनही इतर विकसनशील देशांच्या तुलनेत भारताची आर्थिक स्थिती बरीच स्थिर राहिली. 1991 ला भारताने लागू केलेल्या आर्थिक सुधार कार्यक्रमामुळे अर्थव्यवस्थेमध्ये औद्योगिक उत्पादनाला चालना मिळून त्यात उत्तरोत्तर सुधारणा होत गेल्याचे दिसून येते. म्हणून भारताचे सकल घरेलू उत्पादन 1991 च्या उदारीकरणामुळे सतत वाढत गेले. 1998–99 मध्ये जीडीपी दर 6.5 होते तो 2012–13 मध्ये 7.9 पर्यंत वाढला. कृषी व औद्योगिक क्षेत्रातील गतीने जोर पकडल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताची भूमिका महत्वाची ठरली होती. जागतिक निर्यातीमध्ये जरी भारताचा निर्यात वाटा कमी असला तरी विदेशी व्यापाराची दिशा व संरचना यात महत्वपूर्ण बदल घडून आले. परिणामतः 1998–99 मधील निर्यात 1,01,850 करोड रूपये होती. ती 2013–14 मध्ये 19,31,074 करोड रूपये पर्यंत वाढली. मात्र आजपर्यंत व्यापार क्षेत्रात आयातीपेक्षा निर्यात कधीच जास्त होऊ शकली नाही. भारताने अन्नधान्याच्या उत्पादनात लक्षणिय वाढ केली. संपूर्णतः स्वयंपूर्णता गाठली. अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्र, द्वितियक क्षेत्र व तृतियक क्षेत्र यामधील राष्ट्रीय उत्पन्नाचा दरात आजही सेवा क्षेत्र आघाडीवर आहे. सेवा क्षेत्राचा जास्त विकास हे विकसित राष्ट्राचे लक्षण मानले जाते. परंतु भारत एक विकसनशील राष्ट्र असुनही तृतियक किंवा सेवा क्षेत्राचा अधिक विकास हे प्रगतीचे द्योतक आहे. भारताने आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही महत्वपूर्ण योगदान निर्माण केले आहे. अमेरिका, रशिया यासारख्या देशांबरोबरीच युरोप, आफ्रिका खंडातील काही महत्वपूर्ण राष्ट्रांशी असलेले संबंध उत्तरोत्तर सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेपुढे काही आव्हाने निर्माण झालेली आहेत. प्रचंड वाढणारी लोकसंख्या, विदेशी कर्जाचा भार, अर्थव्यवस्थेत निर्माण होणारा काळा पैसा व त्यामुळे निर्माण झालेली समांतर अर्थव्यवस्था, तेल उत्पादनातील वाढत जाणारे संकट, जागतिकीकरणामुळे उदयास आलेली प्रचंड आर्थिक विषमता, दारिद्रय, बेकारी, शहरीकरणाच्या दृष्टीआड लपत जाणारी ग्रामीण अर्थव्यवस्था हया सर्व बाबी भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने आहेत.

प्रस्तुत अध्ययनात भारताच्या वास्तवाचे चित्रीकरण करून आव्हांनाची दिशा निर्धारित करणे, ती पेलविण्यासाठी काही ठोस उपाययोजना करता येऊ शकते काय हयाविषयी साधक–बाधक चर्चा करणे, त्यावर उपाय सुचविणे इत्यादी बाबींचा विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीज संज्ञा :** जागतिकीकरण, आर्थिक विषमता, आयात–निर्यात, शहरीकरण.

**संशोधन प्रश्न :**

1) 21 व्या शतकात भारताची सफलता व आर्थिक विकासात प्राप्त केलेले यश समाधानकारक आहे.

2) भारताच्या लोकसंख्येतील बेहिसाब वाढीमुळे आर्थिक विकासात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

3) भारताच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमता, बेकारी, दारिद्रय या आव्हानांवर मात करणे अत्यावश्यक आहे.

4) भारतीय अर्थव्यवस्थेतील काळा पैशाचे स्थान, ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या समस्या, खनीज तेलाच्या समस्या, विदेशी कर्जाचा वाढता भार इ. आव्हानांचा विचार आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात केवळ द्वितियक सामुग्रीचा वापर केला आहे. तथ्य गोळा करतांना क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, इंटरनेट, वर्तमानपत्रे, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, मासिके, त्रैमासिके, अहवाल इत्यादी स्रोतांचा वापर केला आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यःस्थिती :**

भारतीय अर्थव्यवस्था अमेरिकन डॉलरच्या विनिमय दराच्या आधारे मापन केले असता जगातील 12 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. 2007 मध्ये असलेला 1,089 अब्ज डॉलर इतका जीडीपी वार्षिक सकल उत्पन्न दर (पीपीपी) च्या आधारे मापन केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचा जगात 3 रा क्रमांक लागतो. चीनच्या अर्थव्यवस्थेनंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा जागतीक अर्थव्यवस्थानंतर दुसरा क्रमांक लागतो. 2006–07 या आर्थिक वर्षातील विकास दर 9.4 टक्के होता व दरडोई उत्पन्न 961 डॉलर होते. परंतु वार्षिक सकल उत्पन्न दराच्या (पीपीपीच्या) आधारे गणना केली असता ते 4,182 डॉलर निश्चित होते. इतर विकसित व विकसनशील राष्ट्रांच्या तुलनेत ते बरेच कमी असल्यामुळे जागतिक बँकेने भारताची वर्गवारी ''अल्प उत्पन्नधारक अर्थव्यवस्था'' या गटात केली आहे. भारताची 2006–07 च्या आर्थिक वर्षात निर्यात 125 अब्ज डॉलर इतकी होती. या निर्यातीमधील प्रमुख भागीदारीत असणारी राष्ट्रे अनुक्रमे अमेरिका 18.8 टक्के, चीन 8.9 टक्के, संयुक्त अरब अमिरात 8.4 टक्के, युनायटेड किंग्डम 4.7 टक्के, हॉंगकॉंग 4.2 टक्के अशी होती. 2006 मध्ये एकूण आयात मूल्य 187.9 अब्ज डॉलर असून आयातीच्या प्रमुख भागीदारीत अनुक्रमे चीन 7.2 टक्के, अमेरिका 6.4 टक्के, सिंगापूर 4.7 टक्के, ऑस्ट्रेलिया 4.2 टक्के, जर्मनी 4.2 टक्के, यु.के. 4.1 टक्के अशी क्रमवारी होती. सार्वजनिक कर्जाच्या बाबतीत 2006 मधील अनुमानीत कर्ज 132 अब्ज डॉलर होते. सरकारचा एकूण महसूल 109.4 अब्ज डॉलर तर सार्वजनिक खर्च 143.8 अब्ज डॉलर होते. 30 ऑक्टोबरच्या आठवडयात 560.71 अरब डॉलर एवढे विदेशी गंगाजळीचे प्रमाण असुन त्यांने आजपर्यंतची सर्वाधिक उंचाई प्राप्त केली होती. 2015 च्या आकडेवारीनुसार कामगार वर्गात असणाऱ्या युवकांची संख्या 50.21 कोटी दिसून येते तर 2002 च्या आकडेवारीनुसार दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण 25 टक्के होते.

वरील आकडेवारीवरून भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती प्रत्ययास येते. भारत जगातील मोठया अर्थव्यवस्थेचा देश म्हणून गणला जातो. चीननंतर भारताचा क्रमांक लागतो. परंतु आर्थिक विकासाच्या बाबतीत जागतिक बँकेच्या वर्गवारीनुसार अल्प उत्पन्न असणारा देश म्हणून मान्यता मिळालेली असल्यामुळे भारताच्या आर्थिक विकासाची गती वाढविणे, राष्ट्रीय उत्पन्नाचा दर वाढविणे, दरडोई उत्पन्नात वाढ करणे, दारिद्रय रेषेखालील जनता कमी करणे हया अडचणींना अधोरेखित करून त्यातील आव्हानांना पेलविण्याचे सामर्थ्य निर्माण करणे महत्वाचे आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास :**

भारत हा कृषीप्रधान राष्ट्र आहे. अजूनही 48 ते 50 टक्के जनता प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने शेतीवर अवलंबून आहे. शेती भारताच्या 50 टक्के लोकसंख्येला रोजगार देणारा मुलभूत क्षेत्र आहे. परंतु शेती विकासाला लागणारी आदाने अजूनही अपूरी पडत आहेत. त्यात वाढ करणे आणि ग्रामीण भागातील जनतेला कृषी रोजगारीत कायम टिकवून ठेवणे आवश्यक आहे. देशातील जनतेला लागणारे अन्नधान्य पुरविण्याचे कार्य कृषी क्षेत्र करते. तर औद्योगिक क्षेत्राला लागणारा कच्चा मालही कृषीच्या विकासावरच अवलंबून आहे. या दोन्ही दृष्टीकोनातून शेतीकडे पाहिल्यास शेती क्षेत्राचे महत्व लक्षात येते. शहरीकरण वाढण्यात ग्रामीण विकासाचे मागासलेपण हेच जबाबदार घटक आहे. शेतकरी आज आत्महत्या करू लागला आहे. तो कर्जबाजारी झाला आहे. हे थांबविण्यासाठी कृषी विकासाची गरज दुर्लक्षूण चालणार नाही. याकरिता भारतीय शेतीच्या काही मूलभूत लक्षणांचा विचार करणे गरजेचे आहे.

भारतात शेतीयोग्य जमिनीचे एकूण क्षेत्रफळ 1269219 किमी$^2$ आहे. एकूण शेतीयोग्य जमिनीशी हे प्रमाण 56.78 टक्के दिसून येते. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे व वाढत्या शहरीकरणामुळे शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्रफळ सतत कमी होत आहे. सरासरी पावसाचे प्रमाण 1,100 मिलीमीटर आहे. 3,14,400 किमी$^2$ जमीन पाण्यानी व्याप्त आहे. 1974 मध्ये 380 किमी$^2$ जमीन जल सिंचनाखाली होती. 2025 पर्यंत ती 1,050 किमी$^2$ इतकी वाढणे अपेक्षित आहे. एकूण वापरात असलेल्या पाण्यापैकी 22 टक्के पाण्याचा वापर शेती सिंचनासाठी होता. तरीही भारतीय शेती मान्सूनवरील जुगार आहे असे म्हटल्या जाते. कारण शेतजमिनीतील अन्नधान्याचे उत्पादन नैसर्गिक पावसावरच अवलंबून असतो. ओलिताखालील शेतीचे प्रमाण अजूनही अल्पच असल्यामुळे एखाद्या वर्षी पावसाने दगा दिल्यास शेतजमिनीचे उत्पादन प्रभावित होते. ज्या वर्षी नियमित व समाधानकारक पाऊस पडतो त्या वर्षी शेतमालाचे उत्पादन अधिक होते. याउलटट ज्या वर्षी पाऊस नियमित होत नाही त्या वर्षी शेतमालाचे उत्पादन कमी होते. ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ हया सारख्या समस्या भेडसावतच राहतात. यासाठी जलसिंचनाचे योग्य नियोजन आवश्यक आहे. आधुनिक शेती, सुधारित बी–बियाणे, रासायनिक खते व जोडीला पाणी पुरवण्याची सोय असली तर शेतकरी हवालदिल होणार नाही. यासाठी सरकारी पातळीवर योग्य सिंचन सोयी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची गरज आहे. तरच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आत्मा समजला जाणारा शेती व्यवसाय व शेतकरी पर्यायाने ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित होईल.

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका व कृषी विकासाची दिशा पुढील आकडेवारीवरून अधिक निश्चित करता येईल. 2014–15 मध्ये कृषीचा वृध्दी दर –0.2 टक्के होता. तो 2016–17 मध्ये 6.3 टक्के पर्यंत वाढला. पुन्हा 2019–20 मधील शेतीचा वृध्दी दर कमी होऊन केवळ 2.8 टक्के झाला. शेतीतील वृध्दी दरातील होणारे अनपेक्षित बदल मान्सुनच्या आकारमानावर व लहरीपणावर किती प्रभाव टाकू शकतात हे यावरून निश्चित करता येते.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील काळा पैसा :**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील मुख्य बाधा म्हणून काळया पैशाचा विचार करावा लागेल. काळा पैसा म्हणजे काय? तो कशाप्रकारे निर्माण होतो. हयासंबंधी विचार करणे भारतीय अर्थव्यवस्थेतील लागणाऱ्या दिमक प्रमाणे आहे. ज्या प्रकारे लाकडाच्या सुंदर ओंडक्याला आतल्या आत दिमक पोखरून टाकतो त्याचप्रमाणे विकसनशील राष्ट्रांच्या अंतर्गत आर्थिक विकासाला काळा पैसा पोखरून टाकतो. साधारणतः काळा पैसा म्हणजे अवैध मार्गाने मिळविलेला पैसा किंवा धन होय. ज्या प्राप्त उत्पन्नावर कर आकारणी शक्य असतानाही कराची रक्कम चुकविण्यासाठी ती प्रत्यक्ष दाखविली जात नाही. त्याला काळा पैसा म्हणतात. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक एंड पॉलिसी (एनआईपीएफपी) च्या व्याख्येनुसार 'काळा धन असे उत्पन्न आहे की जे उत्पन्न करपात्र असुनही त्याविषयी कर विभागाला माहिती दिली जात नाही.' अर्थात करचोरी करण्याची प्रवृत्ती व त्यातून प्राप्त केलेले अवैध उत्पन्न म्हणजे काळा पैसा होय. काळया पैशामुळे सरकारच्या उत्पन्नात खंड

पडतो. आणि देशातील मर्यादित वित्तिय साधनांना अवांछित दिशेत परिवर्तीत केले जाते. काळया पैशाची समस्या इतर समस्यांपेक्षा भिन्न आहे. कारण जेव्हा आपण सामान्य आर्थिक समस्यांचा विचार करतो जसे– गरिबी, मुद्रास्फिती किंवा बेरोजगारी या समस्यांकडे बघतांना गरिब आणि बेरोजगारीच्या समूह किंवा संख्यात्मक विचार करतो. व त्याकडे लक्ष केंद्रित करतो. परंतु काळया धनाच्या बाबतीत असा विचार करत असतांना ज्या व्यक्ती काळया धनाचा संग्रह करतात त्या व्यक्तीवर कोणतेही प्रभाव पडत नाही. त्या ऐवजी वंचित लोक किंवा सरकार प्रभावित होत असते. हे काळया धनाचे वेगळे वैशिष्टये आहे.

काळया धनाचे उगमस्थान दोन प्रकारे होत असते. पहिल्या प्रकारात अनेक अपराधिक कार्यांचा समावेश होतो. आणि हयात अनेक अवैध साधनांचा वा संसाधनांचा उपयोग करून पैसा मिळविला जातो. उदा. अपहरण, तस्करी, नशीली दवा, अवैध खनन काम, घोटाळे यांचा समावेश यात होत असतो. त्याचप्रमाणे रिश्वतखोरी आणि चोरी हे सुध्दा काळा धन निर्माण करण्याचे स्रोत आहेत.

दुसऱ्या प्रकारात प्रामुख्याने कराची चोरी करण्यासाठी कर विभागाला आपल्या उत्पन्नाची पूर्णतः माहिती दिली जात नाही. आपल्या वार्षिक उत्पन्नाची पूर्ण जाणकारी न देता एकूण वास्तविक उत्पन्नापैकी फारच थोडी रक्कम कर निर्धारणात दर्शविली जाते. म्हणजे, वास्तविक उत्पन्न व घोषित उत्पन्न यामधील अंतर म्हणजे काळा धन असे दर्शविता येते. हे अंतर जितके जास्त तितका काळा धन निर्मितीचे प्रमाण जास्त असते. काळया धनाचे अनुमान लावण्यासाठी इनपुट–आऊटपुट परिणाम या उपायाचा विचार करता येतो. जसे एखाद्या देशात एक विशिष्ट राशीची गुंतवणूक केली असता एक विशिष्ट उत्पादनाची मात्रा निर्माण होते. परंतु गुंतवणूकीच्या मात्रेपेक्षा उत्पादनाची मात्रा ;नजचनजद्ध विशिष्ट मात्रेपेक्षा कमी होत असेल तर गुंतवणूकीतील एक भाग काळया धनात रूपांतरीत झाला असे म्हणता येते. मात्र अर्थव्यवस्थेच्या संरचनेत बदल, उत्पादन क्षमतेत वाढ आणि तंत्रज्ञानातील बदलांचा विकास झाल्यास हा प्रकार लागू होणार नाही. काळा धन मोजण्याच्या दुसऱ्या उपायात अर्थव्यवस्थेचा आकार व मुद्रेचे परिचालन यांच्यातील तुलना करणे हयाचा समावेश होतो. हा प्रकार अशा सुत्रांशी संबंधीत आहे की, ज्यात मुद्रेचा वापर हा सामान्य व समांतर अर्थव्यवस्था अशा दोन्ही बाजूला केला जातो. लहान अर्थव्यवस्थेत चलनातील पैशाचा अतिरिक्त पुरवठा व चलन क्षमतेत अधिक पैशाचा वापर असे दर्शविते की, अर्थव्यवस्थेत समांतर अर्थव्यवस्था अस्तित्वात आहे. मात्र अशा अनुमानात असंगठीत क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेला नियमित अर्थव्यवस्थेत समाविष्ठ करता येत नाही.

**भारत व काळा पैसा :**

काळा पैसा मोजण्याचा कोणताही अचूक प्रकार दिसून येत नाही. सर्व प्रकार जुने व कालबाहय आहेत. एनआईपीएफपी च्या एका अभ्यासानुसार 1983–84 मध्ये 32,000 ते 37,000 करोड रूपये काळा पैसा अस्तित्वात होता. 2010 मध्ये ग्लोबल फायनानशियल इंटिग्रीटीच्या अनुमानानुसार 1948 ते 2008 या कालखंडात भारतात 462 अबर डॉलर इतकी धनाची रक्कम काळया पैशाच्या रूपात देशाबाहेर गेली होती. सरकारने अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या काळया पैशावर प्रतिबंध घालण्यासाठी एंटीमनी लॉन्डिंग कायदा मजबुत केला. काळया पैशाच्या नियंत्रणासाठभ् वैश्विक मोहिम सुरू केली. यासंबंधीच्या सूचना देण्यासाठी अन्य बऱ्याच देशांशी समझोता केला. काळा पैसा निर्मितीत रोक लावण्याकरिता यतार्थवादी कर रचना धोरण अमलात आणला गेला पाहिजे. कराचा उच्च दर करचोरी करण्यास मदत करणाराच असतो, कर संग्रहित करण्याच्या प्रक्रियेला अधिक चांगली व सफल बनविणे. हा एक उपाय अंमलात आणता येतो. त्याकरिता अधिकाऱ्यांमध्ये इमानदारी निर्माण करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे व त्यासंबंधी जनतेमध्ये गंभिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे असते. काळा पैसा निर्मितीवर रोक लावण्याकरिता सरकारने किंमत नियंत्रण नीतीवर कार्य केले पाहिजे. ते एक काळा पैसा निर्मितीचे कारण आहे. सार्वजनिक क्षेत्रातील योजनांवर खर्च करतांना त्या योजनांवर नियमित रूपाने नजर

ठेवावी. त्यामुळे खर्चात बचत होऊ शकते. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रातील खर्चाचे योग्य निरिक्षण व परिक्षण करावे. आणि अधिक महत्वाचे म्हणजे सरकारी क्षेत्रातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या विरोधात योग्य व सक्षम कारवाई करावी. त्यांचे काळया पैशाच्या निर्मितीत योगदान असते. डॉ. राजा जे. चलैया यांच्या म्हणण्यानुसार कराचे दर शून्य करून सर्व नियंत्रण हटविले गेले तर काला धन समूळ नष्ट होऊ शकेल.

**विदेशी कर्जाचा वाढता भार :**

अर्थव्यवस्थेवरील विदेशी कर्जाचा भार कसा कमी करावा हे देशापुढील एक गंभीर आव्हान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर विदेशी कर्जाचा मोठा भार असून व्याजाच्या रूपाने फार मोठी रक्कम परत करावी लागत आहे. मार्च 1999 मध्ये 98.2 अरब डॉलर कर्ज भारतावर होते. मार्च 2004 मध्ये ते 112.5 अरब डॉलर झाले. मार्च 2017 मध्ये ते 471.9 अरब डॉलर, मार्च 2018 मध्ये 529.3 अरब डॉलर, मार्च 2019 मध्ये 543 अरब डॉलर, आणि जून 2019 मध्ये 557.4 अरब डॉलर असा वाढत गेला आहे. विदेशी कर्जाच्या सतत वाढीमुळे अर्थव्यवस्थेवरील ताण वाढतच आहे. वरील आकडेवारीवरून विदेशी कर्जाची प्रवृत्ती स्पष्ट होते. विदेशी कर्ज सतत व अखंडित रूपाने वाढत आहे. या कर्जावरील व्याजाची रक्कम अजूनच कर्जाच्या भारात वाढ घडवून आणत आहे. आर्थिक विकासाचा दर पाहिला तर विदेशी कर्जाच्या प्रमाणापेक्षा विकासदर कमीच आहे. त्यामुळे विदेशी कर्ज कशाप्रकारे कमी करावे हे आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेपुढे निर्माण झाले आहे.

विदेशी कर्जाच्या समस्येवर उपाय करण्यासाठी आंतरिक संसाधनांमध्ये वाढ होणे महत्वाचे आहे. परंतु गरीबी, बेरोजगारी आणि औद्योगिकरणातील मागसलेपण या कारणांमुळे आंतरिक संसाधनांमध्ये वृध्दी होणे कठीण आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेवरील तेल संकट :**

भारतात पेट्रोल, तेल आणि लुब्रिकेंटस्चे उत्पादन मागणीपेक्षा कमी होते. अतिरिक्त तेलाची मागणी आयातीद्वारे पूर्ण केली जाते. 2017–18 मध्ये 22 करोड टन तेलाची आयात करण्यात आली. 2018–19 मध्ये त्यात थोडी घट होऊन 20.7 करोड टन कच्च्या तेलाची आयात करण्यात आली. भारतात सर्वाधिक कच्च्या तेलाची आयात सौदी अरेबियामधून केली जात असे. परंतु 2017–18 मध्ये प्रथमच सौदी अरेबियाचे स्थान इराणने घेऊन एप्रिल 2018 ते मार्च 2019 या वर्षात 4.66 करोड टन कच्च्या तेलाचा पुरवठा केला. हे प्रमाण एकूण आयात तेलाच्या 20 टक्के होते. इराण हा तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे की, ज्यातून भारताला लागणारा तेल पुरविला जातो. त्यानंतर नायजेरियाचा क्रमांक लागतो. 2017–18 मध्ये नायजेरियाने भारताला 1.81 करोड कच्चा तेल पुरविला. तर 2018–19 मध्ये 1.68 करोड कच्चा तेल नायजेरियाकडून भारताला विकला गेला. कुवैतकडून 1.07 करोड टन तर मेक्सिकोकडून 1.02 करोड टन कच्च्या तेलाची आयात करण्यात आली. अमेरिकेकडून कच्चा तेल पुरविण्याचे प्रमाण 4 पटीने वाढले. 2018–19 मधील कच्च्या तेलाच्या पुरवठयात आज अमेरिका प्रमुख देश बनत आहे. या वर्षात अमेरिकेने 64 लाख टन कच्चा तेल भारताला पुरविला. जेव्हा की 2017–18 मध्ये भारताने अमेरिकेकडून 14 लाख टन कच्चा तेलाची आयात केली.

भारतात तेलाचे भंडार असलेले स्थान आसाम असून तो प्रथम स्थानी आहे. 1889 डिगबोई या शहराजवळ तेलाच्या खाणी मिळाल्या. गॅस उत्पादनाच्या क्षेत्रात आसाम व गुजरात प्रथम स्थानी आहेत. 1889 मध्ये खणणकार्यातून या दोन राज्यात गॅस उत्पादनाची सुरूवात झाली. एकंदरीत, खनिज तेल आणि लुब्रिकेंटस्च्या उत्पादनात भारताला बरीच मजल गाठावयाची आहे. देशाला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक गॅस, लुब्रिकेंट या सर्व उत्पादनाच्या क्षेत्रात एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**लोकसंख्या नियंत्रणाचे आव्हान :**

देशातील उत्पादित खाद्यान्न व उपलब्ध संसाधनांच्या प्रमाणात लोकसंख्या तीव्र प्रमाणात वाढणे म्हणजे लोकसंख्येची अनियंत्रित वृध्दी होय. घटता मृत्यु दर व स्थिर जनन दर यांच्या विसंगतीमुळे लोकसंख्या वृध्दी होत असते.

कोणत्याही देशातील लोकसंख्या म्हणजे त्या देशातील मानव संसाधन असते. या दृष्टीने ते आवश्यकही असते. परंतु त्याचे प्रमाण अत्यल्प किंवा अतिरिक्त नसावे. आदर्श असावे. लोकसंख्येच्या बाबतीत भारत जगात दुसऱ्या स्थानी आहे, हे सर्वश्रृत आहे. परंतु भारतातील लोकसंख्या केवळ जास्तच नाही तर अतिरिक्त झाली आहे. त्यामुळे भारतातील अतिरिक्त लोकसंख्या अनेक समस्यांना जन्म देत आहे. संयुक्त राष्ट्राच्या 'द वर्ड पॉपुलेशन प्रॉस्पोटस् 2019 हाईलाईट' नामक रिपोर्टनुसार वर्ष 2027 पर्यंत भारत क्रमांक 1 चे स्थान घेईल. 2050 पर्यंत भारताची एकूण लोकसंख्या 1.64 बिलीयनचा आकडा पार करेल आणि जगाची एकूण लोकसंख्या 2 बिलीयन होईल. त्यात युवा वर्गाचे प्रमाण जास्त राहील. त्यामुळे, अन्न, निवास, आरोग्य आणि शिक्षण या सर्व जीवनावश्यक वस्तु प्रभावित होतील. भारतासारख्या देशाला हे एक मोठे आव्हान असेल. निर्धन व गरीब लोकांमध्ये 3.2 प्रतिशत, मध्यम वर्गात 2.5, उच्च समुहात 1.5 असा प्रतिशत दर राहील. परिणामतः गरीबी, भूकमरी आणि कुपोषणाचे प्रमाण वाढेल. गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार नाही.

**वाढत्या लोकसंख्येचे अर्थव्यवस्थेवरील दुष्परिणाम :**

अतिरिक्त लोकसंख्येमुळे बेरोजगारी वाढेल. पर्यावरणाचे संतुलन बिघडून नैसर्गिक समस्या निर्माण होतील. निवासाच्या सोयी अपूऱ्या पडतील. जीवनस्तर निम्न होईल, याचबरोबर अपराध, चोऱ्या, भ्रष्टाचार, काळाबाजारी व तस्करी या समस्यांना तोंड द्यावे लागणार. जल प्रदूषण, वायु प्रदूषण आणि जमीन प्रदूषण इत्यादी समस्या निर्माण होणार.

वरील सर्व समस्यांचे मुळ लोकसंख्येच्या अतिरिक्त वृध्दीमुळे जन्मास आलेले असेल याकरिता भारतातील लोकसंख्या स्थिर कशी राहील यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. बिहार, युपी, हरियाना, मध्यप्रदेश, झारखंड, छत्तीसगड या राज्यातील लोकसंख्या स्थिर ठेवण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. लोकांचे जीवनमान, जीवनस्तर गुणवत्तापूर्ण राहण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, खाद्यान्न, आरोग्य, स्वास्थ्य यात विशेष गुंतवणूक करण्याची गरज आहे. घर, स्वच्छ पाणी, सडक व परिवहन, विद्युत उत्पादन व वितरण या मूलभूत सेवांचा विकासावर विशेष गुंतवणूकीची गरज निर्माण झाली आहे.

2050 पर्यंत देशातील शहरी लोकसंख्या 7 मिलीयन होईल. त्यामुळे शहरी सुविधा, निवास यावर प्रभाव पडणे स्वाभाविक आहे. त्यात पर्यावरणाचाही विचार करणे महत्वाचे राहील. सर्वात महत्वाचे म्हणजे वाढत्या लोकसंख्येमुळे उत्पन्नात प्रचंड असमानता निर्माण होईल. वितरणातील असमानता, दारिद्रय, गरीबी, बेरोजगारी, यातील असमानता वाढीमुळे लोकांच्या मनात नकारात्मकता निर्माण होईल.

काही विचारवंतांच्या मते, वाढती लोकसंख्या हे अर्थव्यवस्थेच्या दोषांना कारणीभूत होणार नाही. उलट नैसर्गिक व मानवी संसाधनांचा युक्त वापर करण्यास सहाय्यभूत ठरेल. त्यामुळे सामाजिक–आर्थिक समस्येचा मुळ कारण वाढती लोकसंख्या नसून भ्रष्टाचार, संसानांचे असमान वितरण, गरीबी–अमीरी मधील वाढणारी दरी आणि विज्ञान व प्रौद्योगिकीचा अल्प विकास हे असणार आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेपुढील काही प्रमुख आव्हानांचा वरीलप्रमाणे विचार केल्यानंतर त्यावर काय उपाय योजावे याविषयीचेही विवेचन ओघाने आलेच आहे. त्यामुळे जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून मजबुत व विकसीत म्हणून जगाच्या पटलावर येण्यासाठी काही ठोस पावले उचलण्याची गरज आहे. काही मोजके उपाय पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) लोकसंख्येची वाढ स्थिर व नियंत्रित करण्यासाठी शक्य तेवढे ठोस उपाय शासकीय पातळीवर योजने गरजेचे आहे. चीनमध्ये ज्याप्रमाणे 'हम दो हमारा एक' असा नारा जनतेत बुलंद केला व लोकसंख्या नियंत्रित व स्थिर केली त्याचप्रमाणे भारताला कठीण पण लोकशाही मार्गाने जनतेच्या मानसिकतेमध्ये परिवर्तन घडवून आणणे व लोकसंख्या स्थिर राहू शकेल यासाठी वेगवेगळया मार्गाने, वेगवेगळया पातळीवर जाणिव जागृती निर्माण करणे असे धोरण व

निर्णय आखायला पाहिजेत. लोकसंख्या नियंत्रणाच्या गांधीजीचा मार्ग आता कालबाहय झाला आहे. अपत्य निर्मितीत सर्वसामान्य लोक संयम बाळगतील अशी अपेक्षा फोल ठरली आहे.

2) समाजात 'लहान कुटुंब सुखी कुटुंब' असा नारा घरोघरी पोहचला पाहिजे. तसा प्रचार व प्रसार करण्याची अत्याधिक गरज निर्माण झाली आहे. त्याकरिता प्रचार माध्यमाचा वापर करायला पाहिजे. समाजातील सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक प्रचारक, प्रतिष्ठेचे व प्रभावी व्यक्ती इत्यादींना प्रचारक म्हणून नियुक्ती करून कुटुंब मर्यादित राखण्याचे महत्व सांगणे, प्रलोभने देणे, इत्यादी मार्गाचा अवलंब करणे योग्य ठरेल. या मार्गांचा अवलंब केल्यास लोकसंख्येवर नियंत्रण प्रस्थापित होण्यास मदत होईल.

3) ग्रामीण अर्थव्यवस्थेला गृहित धरून चालणे हे सरकारचे फार मोठे अपयश आहे. कारण आजही शेती व शेतीसंबंधीत तत्सम व्यवसाय यात एकूण लोकसंख्येपैकी 50 टक्क्यापेक्षा अधिक लोकसंख्या गुंतलेली आहे. कृषी क्षेत्रात सर्वाधिक रोजगार उपलब्ध होत आहेत. या लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन तथा रोजगार कृषी व तत्सम व्यवसायात आहे. म्हणून उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासापेक्षाही कृषी क्षेत्राच्या विकासाचे महत्व अधिक आहे. शासनाने या गोष्टीची दखल युध्द पातळीवर घेतली पाहिजे.

4) भारतात नैसर्गिक साधनसामुग्रीची विपूलता आहे. परंतु संसाधनांचा युक्त व पुरेपुर वापर केला जात नाही. नवनवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने संसाधनांचा वापर करून शाश्वत विकासाची कास धरावी. आपण सुखाने जगलो पाहिजे व आपल्या भविष्यातील येणाऱ्या पिढीसाठी संसाधने जतन करून ठेवता आली पाहिजे. अशा प्रकारचा शाश्वत विकास करून सर्वसमावेशक वृध्दी साध्य केली पाहिजे. गरीबातल्या गरीब व्यक्तीला विकासाची फळे चाखता आली पाहिजेत. असा विकास सर्वसमावेशक वृध्दीने विकास होय. ते साध्य करणे देशाच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक आहे. शासन पातळीवर या बाबींचा विचार अगत्याने झाला पाहिजे. नव्हे करायलाच पाहिजे.

5) भारतात खनिज तेलाच्या आयातीवर मोठा खर्च होताना दिसत आहे. त्यामुळे आर्थिक विकास प्रभावित होत आहे. आयातीवरील हा खर्च कमीत कमी करायला पाहिजे. खनिज तेल, गॅस व लुब्रिकंटस्चे उत्पादन वाढले पाहिजे. याकरिता संशोधनाची गती तीव्र केली पाहिजे. खाजगी भांडवलदारांना खनिज तेलाच्या उत्पादनात व संशोधनात भाग घेण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजेत. त्या दृष्टीने काही सोयी–सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजे. वाढत्या लोकसंख्येनुसार तेलाची मागणीही सातत्याने वाढत आहे. तेलाची वाढ पूर्ण करण्याकरिता देशांतर्गत उत्पादनात वाढ घडून आली पाहिजे व त्याकरिता खाजगी भांडवलदारांना या दिशेने प्रवृत्त करणे महत्वाचे ठरणार आहे.

6) भारतात तीव्र दारिद्रय आहे. गरीबी, भुखमरी व बेकारी या अर्थव्यवस्थेला लागणाऱ्या रोगाप्रमाणे आहेत. संपूर्ण भारतीय समाज निरोगी असायला पाहिजे. मानव विकासात अजुनही भारताचा क्रमांक वरचा आहे. सद्यःस्थितीत तो जागतिक क्रमवारीत 129 व्या स्थानी आहे. अर्थात जनतेच्या कल्याणात पडणारी भर खुंटित झाली आहे. गरीबी व दारिद्रय नष्ट केल्याशिवाय मानव विकास निर्देशांक वाढणार नाही. प्रत्येकाच्या हाताला काम मिळायला पाहिजे. शुन्य बेकारीची पातळी गाठण्याच्या दृष्टीने वाटचाल करणे अगत्याचे आहे. सरकार व शासन पातळीवर या गोष्टींची दखल घेण्यात आली पाहिजे.

**समारोप :**

भारतीय अर्थव्यवस्थेतील आव्हानांवरून असे निदर्शनास येते की, देशाच्या सर्वांगिण विकासासाठी एक नव्हे तर अनेक आव्हानांना पेलविण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याची गरज आहे. कोणतीही गोष्ट अशक्यप्राय नाही. सिंगापूर, थायलंड, मलेशिया व दक्षिण कोरीया इत्यादी राष्ट्रामध्ये सन 1990 च्या दशकात मोठे आर्थिक संकट ओढवले होते. त्यांच्या अर्थव्यवस्था इतिहासाच्या पडद्याआड झाकल्या जातील काय? अशी स्थिती निर्माण झाली होती. परंतु या राष्ट्रांनी आपल्या देशावरील संकटाचा गांभीर्याने विचार करून अवघ्या 10 ते 12 वर्षात आर्थिक संकटांवर मात केली. आज या राष्ट्रांना पूर्व आशियायी वाघ संबोधिले जाते. यास्तव कोणतीही गोष्ट अशक्य नाही. ते साध्य करण्यासाठी तीव्र इच्छाशक्ती असावी लागते. जाती धर्माच्या राजकारणात संपूर्ण शक्ती खर्च करणे हे मानसिक रोग्याप्रमाणे आहे. सरकार व शासनाने योग्य नियोजन आखुन केवळ विकासावर लक्ष केंद्रित केले तर काहीही अशक्यप्राय नाही. गरीबांच्या उत्थानाचे आटोकाट प्रयत्न केल्यास, गरीबांच्या हाताला काम दिल्यास, रोजगाराची पातळी वाढविल्यास, समाजाची क्रयशक्ती वाढून अर्थव्यवस्थेचे चक्र गतिमान होईलच, त्याचबरोबर भुखमरी, गरीबी नष्ट होऊन समाजाचा कधी नव्हता तेवढा विकास साधला जाईल. केवळ महासत्तेचे स्वप्न पाहणे मृगजळाप्रमाणे आहे. ते प्रत्यक्षात उतरण्यासाठी फार मोठया हृदयाची गरज आहे, मानवतेची गरज आहे, करूणेची गरज आहे. हे लक्षात घेऊन सत्ता चालविणारा सत्ताधारी मिळाल्याशिवाय काहीही साध्य होणार नाही. पाहु या 21 व्या शतकाची वाटचाल कोणत्या दिशेने होते. विकसनशील राष्ट्राचे रूपांतर विकसीत राष्ट्रात केव्हा होते. ते शक्य झाल्यास भारताला महासत्ता बनण्यापासुन रोखण्याची कोणाचीही प्राज्ञा नाही.

**संदर्भसूची :**


1. भागवत ॲडमिरल : 'जागतिकीकरण नवीन गुलामगिरी', समता प्रकाशन, समता सैनिक दल, डॉ. आंबेडकर उड्डान पूल, लष्करीबाग, नागपूर–17.
2. दत्त गौरव, महाजन अश्विनी : 'भारतीय अर्थव्यवस्था', एस. चन्द ॲण्ड कंपनी प्रा. लि. रामनगर, नई दिल्ली–110055.
3. कराडे जगन : 'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने', डायमण्ड पब्लिकेशन्स, 264/3, शनिवार पेठ, 302, अनुग्रह अपार्टमेंट, ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे–411030.
4. कांबळे उत्तम : 'जागतिकीकरणातील सांस्कृतिक संघर्ष', सुमन प्रकाशन, 569, सदाशिव पेठ, पुणे–411030.
5. खेर, सी. पं. 'दारिद्रयाची संकल्पना आणि निवारण', दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., 251–क, शनिवार पेठ, पुणे–411030.
6. म्होपरे राहुल : 'अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषद, त्रैमासिक, विद्यापीठ क्वॉर्टर नं. डी–34, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर–416004.
7. नक्वी सय्यद : ॆक ।ळम च्नइसपबंजपवदे प्दकपं च्अजण स्जकण डंजीनतं त्वंकए छमू क्मसीप.110044ण
8. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', जानेवारी–मार्च 2012, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा–425409, जिल्हा नंदूरबार.
9. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', आधुनिक शेती विशेषांक, जाने–मार्च 2013, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा–425409, जिल्हा नंदूरबार.
10. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', ऑक्टोबर–डिसेंबर 2013, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा–425409, जिल्हा नंदूरबार.
11. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', जानेवारी–मार्च 2013, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा–425409, जिल्हा नंदूरबार.
12. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक, एप्रिल–जून 2012, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा–425409, जिल्हा नंदूरबार.
13. पाटील जगन्नाथ : 'अर्थसंवाद', जुलै–सप्टेंबर 2009, शांती प्लाझा, बी–9, शनिवार पेठ, सातारा.

14. सिंह कटार, शिशोदिया अनिल : 'ग्रामीण विकास', तत्वे, धोरण आणि व्यवस्थापन, ѕ ।ळम 2455 ज्मसससमत त्वंकए जीवनेंदक वेए ब्ंससपवितदपं 91320ए ैं।.
15. साठे मधुसूदन : 'नव्या जगाचे अर्थकारण' डायमंड पब्लिकेशन्स, 1691, सदाशिव पेठ, शंकरप्रसाद, को–ऑप. सोसा. तिसरा मजला, टिळक रोड, पुणे–411030.
16. साठे मधुसूदन : 'आशियातील अर्थव्यवस्था' डायमंड पब्लिकेशन्स, 1691, सदाशिव पेठ, शंकरप्रसाद, को–ऑप. सोसा. तिसरा मजला, टिळक रोड, पुणे–411030.
17. शर्मा ओ. पी. : 'भारत में नियोजित विकास और आर्थिक उदारीकरण', आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, एम.एस.एस. हाइवे, जयपूर (राजस्थान).
18. सिंह रमेश : 'भारतीय अर्थव्यवस्था', डब ळतवू भ्पसस म्कनबंजपवद ;प्दकपंद्ध च्तपअंजम स्पउपजमकण
19. शर्मा ओ. पी. : 'भारतीय अर्थव्यवस्था नई शताब्दी में', आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, एम.एस.एस. हाइवे, जयपूर (राजस्थान).
20. झामरे जी. एन. : 'भारतीय अर्थव्यवस्था भाग–1', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
21. ूण्चतपेपपदकपंझतमचवतज.नउउंतपमे
22. आर्थिक सर्वेक्षण 2019–20 च्तेपदकपण्वतहण
23. ूण्उंतनरंसंण्बवउझपदकपं.दमू
24. उंदरनसंण्बवउण्कम
25. कतपीजपपेंण्बवउ
26. उतउण्पापचमकपंण्वतह
27. म्बवदवउपबे ज्पउमे ंचच
28. ीपण्नंतंण्बवउ